११) भूखंडधारकाने / प्रमोटर / बिल्डरने / ठेकेदाराने अथवा प्रकल्प बांधकाम करणाऱ्याने नियोजित निवासी / व्यापारी गाळे धारकांच्या यापुढे येणाऱ्या कोणत्याही तक्रारीस म.न.पा. जबाबदार राहणार नाही. असे प्रतिज्ञापत्र (स्पेशल एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट यांचे स्वाक्षरीचे) सदर इमारतीचा पुर्णत्वाचा दाखला घेणेपूर्वी म.न.पा. कडे सादर करावे. पाणी पुरवठा, जलनि:सारण, उद्यान, अग्निशामक आवश्यक विभागाचे ना हरकत दाखले इकडे सादर करावेत.

१२) इमारतीच्या तळमजल्यावर गाळेधारकाच्या नावे दर्शविलेली टपालपेटी (Letter Box) सुयोग्य ठिकाणी बसविणे बंधनकारक राहील त्याखेरीज इमारतीचा भाग अथवा पूर्णत्वाचा दाखला दिला जाणार नाही.

१३) विकास आराखड्यातील रस्ता रुंदीने बाधीत क्षेत्र नियमानुसार नगरपालिकेच्या ताब्यात देणे बंधनकारक आहे.

१४) इमारतीच्या सलोह कॉंक्रिट (आर.सी.सी.) कामाच्या सर्व बाजूकरिता आधार व आकारासाठी लाकडाचा वापर करु नये. त्यासाठी लोखंडी आधाराचा वापर करणे बंधनकारक राहील.

१५) इंडियन सोसायटी ऑफ स्ट्रक्चरल इंजिनिअर्स, पुणे ३०. या संस्थेकडील मान्यताप्रत दर्जाच्या स्ट्रक्चरल इंजिनिअर्सची इमारतीच्या कामांसाठी नेमणूक करण्यात यावी, तसेच सदरचे काम स्वीकारल्याबाबतचे स्ट्रक्चरल इंजिनिअर्स यांचे पत्र या विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे. सदरचे पत्र सादर केल्याशिवाय इमारतीच्या बांधकामास सुरुवात करु नये.

१६) भुखंडाच्या संबंधित सहामाही अखेरचा कर भरल्याचा करसंकलन विभाग म.न.पा. यांचेकडील दाखला / पावती सादर केल्याविाय बांधकाम चालू करु नये.

१७) मंजूर रेखांकनातील खुली जागा विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे नियम क्र. ११.३.१.५ नुसार तरतुदीचे अधिन विकसीत करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय भाग अथवा पूर्णत्वाचा दाखला दिला जाणार नाही.

१८) विकास आराखड्यातील रस्ता रुंदीने बाधित क्षेत्र नियमानुसार महापालिकेच्या ताब्यात देणे बंधनकारक आहे. रस्ता रुंदीने बाधित क्षेत्र म.न.पा. चे नावे लावून तसा ७/१२ चा उतारा / सुधारित मालमत्तापत्रक व मोजणी नकाशा, भाग अथवा पूर्ण भोगवटापत्रक घेणेपूर्वी या कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे. तसेच सदरहू रस्तारुंदीने बाधित क्षेत्राचे खडीमुरुमीकरण महापालिकेच्या विनिर्देशाप्रमाणे अर्जदार यांनी स्वत: करणे आवश्यक आहे. अथवा महानगरपालिकेच्या त्यावेळेच्या प्रचलित दराने खडीमुरुमीकरण खर्च भरणे आवश्यक आहे.

१९) प्रस्तुत प्रकरणातील जागेचा मोजणी नकाशा वहिवाटीनुसार असून हद्दीबाबत वाद निर्माण झालेस त्यास म.न.पा. जबाबदार राहणार नाही. नगरभुमापन कार्यालयाकडील सुधारित मोजणी नकाशा / मालमत्ता पत्रक सादर केल्याशिवाय बांधकामास भाग अथवा पूर्णत्वाचा दाखला देण्यात येणार नाही.

२०) प्रस्तुत प्रकरणातील भुखंडाचे एकत्रिकरण नगर भूमापन कार्यालयाकडून घेऊन, त्याप्रमाणे सुधारित मालमत्तापत्रक व मोजणी नकाशा भोगवटापत्रक घेण्यापूर्वी या विभागाला सादर करणे आवश्यक आहे.

२१) ३०० चौ. मी. वरील क्षेत्राचे भूखंडावरील इमारतींसाठी ( दाट वस्ती क्षेत्र वगळून) रेन वॉटर हार्वेस्टिंग व्यवस्था करणे बंधनकारक आहे.

२२) भूखंडालगतचे पोहोच रस्ता व आसपासचे क्षेत्रातील पाण्याचा निचरा होणे सार्वजनिक आरोग्याचे दृष्टीने आवश्यक आहे. त्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. ९.१ नुसार योग्य ती उपाय योजना करण्याची सर्वस्वी जबाबदारी विकसक / अर्जदार यांचेवर राहील. अशाप्रकारे पावसाळी पाण्याचा नैसर्गिकरित्या निचरा होण्यास कोणत्याही प्रकारे बाधा येणार नाही. याबाबतची योग्य ती खबरदारी घेणे विकसक / अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील. याबाबत संबंधित गाळेधारक रहिवासी यांची कोणत्याही प्रकारे तक्रार / हरकत निर्माण झाल्यास त्यांचे संपुर्णत: निराकरण करण्याची जबाबदारी विकसक / अर्जदार यांचेवर राहील. त्याची म.न.पा. स कोणत्याही प्रकारे तोषीस लागू देणार नाही. या अटीवर सदरहू बांधकाम चालू करण्याचे संमतीपत्र मंजूर करण्यात येत आहे.

२३) साईटवर राहणाऱ्या सर्व बांधकाम मजूरांसाठी स्वच्छ पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करणे विकसकावर बंधनकारक आहे.

२४) विकास नियंत्रण नियमावलीनुसार इमारतीमध्ये पुरविण्यात आलेल्या पार्किंगचे क्षेत्र गाळे धारकांसाठी विनामोबदला उपलब्ध करून देणे विकसकांवर बंधनकारक राहील

२५) मा. उपविभागीय अधिकारी / मा. अप्पर जिल्हाधिकारी / मा. जिल्हाधिकारी यांचेकडून वर्ग १ साठी जमिनीची विनिश्चिती नंतर व वर्ग २ साठी आवश्यक तो 'ना हरकत दाखला' महानगरपालिकेस सादर केल्याशिवाय जागेवर बांधकामास सुरुवात करणेत येऊ नये.

२६) म्हाडा स द्यावयाच्या सदनिका, पुर्णत्वानंतर म्हाडाकडे हस्तांतरीत झाल्यावरच उर्वरीत इमारतींना भाग / संपूर्ण पुर्णत्वाचा दाखला देण्यात येईल.

२७) भुखंडावरील एकूण बांधकाम क्षेत्र (F.S.I. + NON F.S.I.) २०,००० चौ. मी. पेक्षा जास्त होत असल्यास पर्यावरण विभागाचा 'ना हरकत दाखला' सादर केल्याशिवाय बांधकामास सुरुवात करु नये.

२८) यु.एल.सी. बाबत विकसक यांनी सादर केलेले हमीपत्रास अधिन राहून बांधकाम परवानगी देणेत येत आहे.

स्थळ प्रतीवर मा. सह शहर अभियंता यांची स्वाक्षरी असे.

सह शहर अभियंता करिता
बांधकाम परवानगी विभाग
पिं.चिं.मनपा, पिंपरी, पुणे-१८

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत माहितीसाठी : १) मा. जिल्हाधिकारी, पुणे जिल्हा आर.बी. (पुणे) माहितीसाठी

२) सहा. मंडलाधिकारी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, मनपा / पिंपरी वाघेरे / पिंपरीनगर / चिंचवड / भोसरी / कासारवाडी / आकुर्डी / निगडी प्राधिकरण / सांगवी / पिंपळे गुरव / पिंपळे निलख / पिंपळे सौदागर / वाकड / रावेत / रहाटणी / थेरगाव यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

३) करसंकलन विभाग, मुख्य कार्यालय

४) मा. मुख्याधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास महामंडळ, आगरकर नगर, पुणे ४११००१. (MHADA)

अट.क्र.३१ डेंग्यु, चिकन गुन्या, मलेरिया इ. डासांचे वाढीवर नियंत्रण ठेवणे साठी बांधकामाचे साईट वर साठविलेले पाण्याचे टाक्यांवर